दैनिक

अन्यायाचा प्रतिकार

# रायगड नगरी

महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक २७१ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.२६ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# म्हसळ्यात एकाच रात्रीत ६ घरफोड्या

## चोरांच्या दहशतीखाली म्हसळा शहर : बंद घरे फोडण्याचे प्रकार वाढले

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

भरवस्तीत पाच बंद घरे चोरटयानी फोडली त्यामध्ये आज सकाळी मोमीनपुरा येथील एकघर चोरटयानी फोडल्याचे लक्षात आले त्यामुळे आता एकूण सहा घरे फोडल्याचे तपासी अंमलदार संदीप चव्हाण यानी सांगितले. बंद घरांपैकी कन्याशाळा परिसरां तील सुनील द्वारकानाथ उमरटकर यानी दिलेल्या फिर्यादी वरुन गुन्हा रजि नं.८० /२०२१ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली आहे.

यामध्ये उमरटकर यांचे घरातील देव खोलीतील २५ विविध देवपूजेचे चांदीच्या वस्तू अंदाजे किंमत रु ४१ हजार, सोन्याच्या वस्तू सुमारे १५ हजार व रोख रक्कम रु १२ हजार असा सुमारे ६८ हजाराचा ऐवज लंपास केला.

मंगेश हेगीस्टे यांचे घरांतील रू ७०० किमतीच्या चांदीच्या पूजेच्या वस्तू, मोमीन पुरा येथील नवीद घरटकर यांचे घरांतून रु २ हजार पाचशे, साने आळीतील जमाल तळकर यांचे घरांतून रु ५ हजार अशा रोख रक्कमेवर चोरट्यानी डल्ला मारला. बहुतांश घरे बंदआसल्या ने गुन्हे नोंदविण्यास विलंब होत आसलातरी प्रत्येक घटनेची नोंद चोरीस गेलेल्या मालासह करण्या त येणारअसल्याचेपोलीस सूत्रानी सांगितले.

म्हसळा पोलीस रात्रीची गस्त केवळ जीपचा सायरन वाजवत करतात, पूर्वी पूर्ण शहरांत किमान ३ ते ४ पोलीस पायी गस्त घालत. पोलीस स्टेशनचे हद्दीत नविन नविन समुहाने येणारे विविध फिरस्ते, फेरीवाले, भंगारवाले यांची योग्य त्या रजीस्टर मध्ये आधार, त्यांचे मूळ पत्ता या सर्वांची नोंद होणे जरुरीचे आहे. म्हसळा पोलीस स्टेशन मध्ये आवश्यकते नु-सार स्टाफ नसल्याने आधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कामांचा प्रचंड ताण येतो व नंतर त्याचे मानसिक ताण-तणावात रुपांतर होते.

राज्याचे गृह विभागाने पोलिसां वर ताण न येणे, नागरिकांना सुविधा गतिमान, तात्काळ पुरविणे, गावांत शांतता व सुव्यव स्था राखणे या सर्वांसाठी पोलीस विभागाचे विकेंद्रीकरण करून प्रत्येक तालुक्याला स्वतंत्र पोलीस स्टेशन, प्रमुख म्हणून पोलीस निरीक्षकाची नेमणूक असे असतानाही म्हसळा पोलीस स्टेशनला अद्यापही कायमस्वरूपी पोलीस निरीक्षक, दोन PSI व अनेक पोलीस कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, ती तात्काळ भरल्यास म्हसळा कराना पारदर्शक व गतीमान सेवा मिळेल.



# जेएनपीटी विद्यालयातील शिक्षक व पालकांच्या आंदोलनाला आले यश

## पालक व शिक्षकांच्या मागण्या मान्य



**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी येथील आर के एफ या संस्थेने मुख्याध्यापक रमाकांत गावंड यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्याबाबतचे नियमबाह्य पत्र देऊन शासकीय नियमांचा भंग केल्यामुळे त्याचा निषेध करण्यासाठी तसेच सदर नोटीस त्वरित मागे घ्यावी आणि शासन निर्णया प्रमाणे बंधनकारक असणाऱ्या इतर मागण्या मान्य करण्यासाठी शाळेच्या गेटवर कोविड १९ च्या नियमांचे पालन करून सर्व पालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी संविधानिक मार्गाचे अवलंब करून दि २० डिसेंबर २०२१ पासून बेमुदत धरणे आंदोलनाला सुरवात केली होती. दि २४ डिसेंबर २०२१रोजी बेमुदत धरणे आंदोलनाना यश आले असून शिक्षक व पालकांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आले आहेत.

जवाहरलाल नेहरू पोर्ट विद्यालयाची स्थापना सण १९८९ साली झाली असून त्याचे व्यवस्थापन इंडियन एज्युकेशन सोसायटी मुंबई यांच्या मार्फत गेली ३० वर्षे होत होते. १ जुलै २०१९ पासून जे एन पी टी मॅनेजमेंटने हे विद्यालय चालविण्यासाठी रुस्तोमजी केरावाला फाऊंडेशन, मालाड मुंबई या संस्थेस दिलेले होते. तेव्हापासून आजतागायत हि संस्था अनधिकृतपणे शाळा चालवत होती . या संस्थेस हि शाळा चाळविण्यासाठी शासनाची कोणत्याही प्रकारची मान्यता नव्हती. या संस्थेने महाराष्ट्र शासन निर्णय दि. १७ डिसेंबर २०१२ नुसार हस्तांतरण केलेले नाही.

त्यामुळे हि शाळा चालवीण्याचा त्यांना कोणताही अधिकार नसताना देखील दि. १८ डिसेंबर २०२१ रोजी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक रमाकांत गावंड यांना कोणतेही सबळ कारण नसताना सक्तीच्या रजेवर पाठविले होते. तसेच विनाकारण ६ शिक्षकांना देखील निलंबित करण्यात आले होते. त्यांना अडीच वर्षाचा पगार देखील देण्यात आलेले नव्हते. एकूण ११४ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर अशी बेकायदेशीर अनधिकृत कारवाईची टांगती तलवार उभी होती. या घटनेमुळे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी पालक वर्गात असंतोष निर्माण झाला होता. या कृत्याचा निषेध करण्यासाठी व विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक वर्गांनी २० डिसेंबर २०२१ पासून शाळेच्या गेट समोरच बेमुदत आंदोलनाला बसले होते.

शेवटी २४ डिसेंबर २०२१ रोजी आंदोलनाला यश आले आहे. महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडी कोकण विभाग अध्यक्ष नरसु पाटील, शिक्षक सेना महाराष्ट्र राज्याचे, जिल्ह्याचे पदाधिकारी, न्हावा शेवा अंतर्गत बंदर कामगार संघटना, दहा गाव .../२

# आ.बाळाराम पाटील यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने विविध विकास कामांची उद्घाटने

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जन्मदिनाच्या निमित्ताने आपण समाजाचे ऋण फेडले पाहिजे, गरजवंताला मदत केली पाहिजे ही शेतकरी कामगार पक्षाची पहिल्यापासून उदात्त भूमिका राहिली आहे. त्याचमुळे वाढदिवसाचे भडक किंवा भपकेबाज प्रदर्शन न करता सामाजिक उपक्रमांच्या द्वारे वाढदिवस नेहेमीच साजरे केले जातात. त्याचीच प्रचिती शनिवार दिनांक २५ डिसेंबर रोजी आली. आमदार बाळाराम पाटील यांच्या जन्मदिनाच्या औचित्याने पनवेल तालुक्यामध्ये विविध ठिकाणी विकासकामांची उद्घाटने करण्यात आली. आमदार बाळाराम पाटील यांच्या शुभहस्ते सर्व उद्घाटन संपन्न झाली. यावेळी त्यांच्या समवेत शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, पनवेल तालुका चिटणीस राजेश केणी, रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा योगिता पारधी, सदस्य विलास फडके, कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल चे सभापती डॉक्टर दत्तात्रेय पाटील, पुरोगामी युवक संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष देवेंद्र पाटील, पंचायत समिती सदस्या वृषाली देशेकर,सुभाष भोपी आदी मान्यवरांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उद्घाटन सोहळ्याची सुरुवात वलप येथून करण्यात आली. वलप येथील .../२

# विहिघर येथे नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समितीची सभा संपन्न ; ४ जानेवारीला पनवेल येथे उपोषण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हनुमान मंदिर, विहिघर येथे नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समिति आणि शेतकरी बांधवांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ४ जानेवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ उपोषण करणार असल्याचे नामदेवशेठ फडके यांनी सांगितले. विमानतळामुळे होत असलेल्या राक्षसरुपी नैनाचा नाश करायचा आहे त्यामुळे या नैनाला मोठ्या प्रमाणात विरोध होत आहे. शेतकर्यांना उद्ध्वस्त करणार्या व नावाप-रते शेतकरी म्हणून ठेवणार्या नैनाला मोठ्या प्रमाणावर पनवेल तालुक्यात विरोध होताना दिसून येत आहे. नैना प्रकल्पबाधित शेतकरी उत्कर्ष समिति गेल्या आठ वर्षापासून आक्रमक भूमिका घेताना दिसून येत आहे. या सभेदरम्यान शेतकरी बांधवांनो, या नैनाला हटवायची हे गाणे वाजवीण्यात आले.



पनवेल परिसरात नैना विरोधाची आग धगधगत आहे. नैना म्हणजे केवळ बिल्डरांचा विकास मात्र शेतकऱ्यांना भकास करणारे आहेत. यावेळी .../२

# वाढदिवस अभिष्टचिंतन.....!



दै.रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे यांचे वाढदिवसानिमित्त शाल व पुष्पगुच्छ देवून दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार, ज्येष्ठ पत्रकार अरविंद पोतदार, सय्यद अकबर, किरण बाथम, पत्रकार गणपत वारगडा यांनी अभिष्टचिंतन केले.



दै.रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना दै.रायगड नगरीचे मुख्य संपादक सुनील पोतदार, ज्येष्ठ पत्रकार अरविंद पोतदार, सय्यद अकबर, किरण बाथम, पत्रकार गणपत वारगडा, सुनील वारगडा, भारत बनसोडे



दै.रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे यांना दैनिक रायगड नगरीच्या मुख्यालयात मनःपूर्वक वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना पनवेलचे मुंढे ट्रान्सपोर्टचे मालक नरेश उर्फ (बाबु) भालचंद्र मुंढे, सुरेश धर्मा पाटील, एस.टी.महामंडळाचे निवृत्त कर्मचारी जनार्दन ठाकूर



दै.रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना प्रतिक वेदपाठक, भारत बनसोडे, सुनील वारगडा



दै.रायगड नगरीचे संपादक राकेश पितळे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना सामाजिक कार्यकर्ते रवींद्र पाटील, सुनील वारगडा

# स्वागतार्ह पाऊल

महाराष्ट्राच्या विधिमंडळाने सर्वसंमतीने महिलांवरील अत्याचारांना आळा घालण्यासाठी 'शक्ती कायदा' बनविण्यासाठीचे विधेयक मंजूर केले आहे. राज्यपालांच्या संमतीनंतर या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होईल आणि महाराष्ट्रातील पोलिस तसेच न्यायव्यवस्था यांच्या हातात महिलांचे संरक्षण करण्यासाठी एक नवे कायदेशीर शस्त्र उपलब्ध होईल. महाराष्ट्र हे आपल्याला आपलेच कौतुक करून घेण्यासाठी 'पुरोगामी राज्य' वाटत असले; तरी वस्तुस्थिती तशी नाही. महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचार सातत्याने वाढत आहेतच; पण त्या अत्याचारांची निर्घृणता तसेच प्रकार अंगावर काटा आणणारे आहेत. या नव्या कायद्यात 'ॲसिड हल्ल्यांना बळी पडणाऱ्या महिला' अशी वेगळी वर्गवारी करण्यात आली आहे. मुंबईपासून गोंदियापर्यंत आणि बीडपासून पुण्यापर्यंत सर्वत्र महिलांवर ॲसिडहल्ले होत आहेत. चार वर्षांपूर्वी महाराष्ट्र सरकारने ॲसिडहल्ला सोसणाऱ्या महिलांना तात्काळ दहा लाख रुपयांची भरपाई तसेच औषधोपचार देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतरही ही विकृती कमी झालेली नाही. अनेक तरुणी भरपाईची रक्कम घ्यायला जिवंतही राहात नाहीत. या पार्श्वभूमीवर नव्या शक्ती कायद्यामध्ये अशा विकृतांना किमान १५ वर्षे ते आजीवन कारावास देण्याची तरतूद आहे. तसेच, हल्लेखोरांना जबर दंड करून त्या रकमेतून पीडित महिलांवर उपचार करण्याचेही कलम नव्या कायद्यात आहे. महाराष्ट्राचा 'शक्ती' हा नवा कायदा पुष्कळसा आंध्र प्रदेशातील 'दिशा' कायद्यासारखाच आहे. मात्र, २०१९ मध्ये सत्तेवर आल्यानंतर मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांनी अतिशय वेगाने हा कायदा करून घेतला आणि त्या कायद्याखाली आंध्रमध्ये गुन्हेगारांना मृत्युदंडापासून जन्मठेपेपर्यंतच्या शिक्षा जलदगती न्यायालयांच्या मार्फत झाल्या आहेत. आंध्रमधील हा वेग कौतुकास्पद आहे. महाराष्ट्रात एकतर हा कायदा होण्यास बराच विलंब झाला आहे. आता तरी राज्य सरकारने तो अमलात आणण्यासाठी आवश्यक असणारी सारी यंत्रणा तातडीने उभारून महिलांना दिलासा देण्याची गरज आहे. विधिमंडळात सध्या सत्ताधारी आणि विरोधक हे परस्परांशी शत्रूसारखे वागत असले तरी या कायद्यावर एकमत होणे, स्वाभाविक होते. तसे ते झाले. नव्या प्रारूपामध्ये काही बदल करण्यात आले आहेत. महिलांचा सध्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांतून होणारा मानसिक छळही वाढला आहे. या कायद्यात आता डिजिटल माध्यमातून आक्षेपार्ह वर्तन केल्यास कठोर शिक्षा देण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे, गुन्हा नोंदविला गेल्यापासून तीस दिवसांमध्ये तपास पुरा करावाच लागेल. अपवादात्मक स्थितीत अनुमती घेऊन ही मुदत फक्त एकदाच तीस दिवसांनी वाढविता येईल. पोलिस तपास जर इतक्या वेगाने होणार असेल तर सरकारला त्यासाठी पोलिस दलाची कुमक वाढवावी लागेल. त्याचप्रमाणे, वेगाने होणाऱ्या तपास कामाची तार्किक परिणती गाठायची असेल तर पुढे खटला दाखल होऊन निकालही त्याच वेगाने लागायला हवेत. यासाठी कायद्यात तरतूद असली तरी सरकारने जलदगती न्यायालय तसेच इतर सुविधाही वेगाने निर्माण करायला हव्यात. कोणताही कठोर कायदा केल्यानंतर त्याचा गैरवापर होण्याची शक्यताही असते. महाराष्ट्रातच काय, देशभरात हे वारंवार दिसून आले आहे. नव्या शक्ती कायद्याचा असा गैरवापर होऊ नये, यासाठी राज्य सरकारने केलेल्या तरतुदींचे विशेष स्वागत करायला हवे. खोट्या तक्रारी केल्याने किंवा गुन्हे गुदरल्याने साऱ्या तपास आणि न्यायप्रक्रियेची विश्वासार्हताच धोक्यात येते. त्यामुळे, असा गैरवापर करणाऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी लागते. आता खोटी तक्रार केल्यास एक लाखापर्यंतचा दंड आणि तीन वर्षांपर्यंतचा कारावास होऊ शकतो. काही काळापूर्वी राष्ट्रीय गुन्हेनोंदणीची जी आकडेवारी प्रकाशित झाली होती; तीनुसार अत्याचार करून महिलांचा खून करण्याचे प्रमाण देशात सर्वाधिक होते. यावरचा, तपास यंत्रणा किंवा सरकारचा नेहेमीचा युक्तिवाद असा असतो की, आपल्याकडे गुन्ह्यांची नोंद होते, म्हणून ही आकडेवारी जास्त दिसते. इतर राज्यांमध्ये गुन्ह्यांची नोंदच होत नाही. मात्र, हे समर्थन पटणारे नाही. इतर राज्यांचे सोडा. महाराष्ट्रातीलच आधीच्या आकड्यांपेक्षा बलात्कार, खून किंवा हल्ले किती वाढले आहेत, हे तरी निदान पाहायला हवे. ही आकडेवारी पाहिली तरी राज्यातील महिला वाढत्या संख्येने अत्याचारांना बळी पडत आहेत. दुर्दैव म्हणजे, अल्पवयीन मुलींवर होणारे लैंगिक अत्याचारही संपलेले नाहीत. नव्या कायद्याने एका रात्रीत सारे चित्र बदलेल, असे नाही. मात्र, या कायद्याची थोडीतरी जरब निर्माण होईल. हे आव्हान केवळ कायद्यांनी पेलता येत नाही. त्यासाठी सतत समाजशिक्षण व जागरण करावे लागते. त्या आघाडीवर महाराष्ट्राचे चित्र मुळीच समाधानकारक नाही. कठोर कायदा करीत असतानाच राज्य सरकार व इतर समाजधुरिणांनी याही आघाडीवर नेमके काय करता येईल, याचा विचार आता करायला हवा.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## जेएनपीटी विद्यालयातील शिक्षक व पालकांच्या आंदोलनाला आले यश

विद्यार्थी माजी संघटनेचे अध्यक्ष कृष्णा पाटील, मुकुंद गावंड ,उरण सामाजिक संस्था, विजय विकास सामाजिक संस्था, छावा संघटना उरण, उरण एकजूट संघटना, माजी विद्यार्थी संघटना, प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष दिनेश घरत, पंचायत समिती सभापती समिधा म्हात्रे, उपसभापती शुभांगी पाटील,ॲड -रत्नदीप पाटील, अमर पाटील, ॲड सागर गावंड आदी मान्यवरांनी तसेच सर्व राजकीय पक्षांनी या आंदोलनाला जाहिर पाठिंबा दिला होता.

सदर समस्यांचे निवेदन पत्रव्यवहाराद्वारे शालेय शिक्षणमंत्री वर्षाताई गायकवाड, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री आदितीताई तटकरे, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, अतिरिक्त मुख्य सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग -वंदना कृष्णा मॅडम, चेअरमन-जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट, आ. बाळाराम पाटील, आर के एफ संस्थेचे उपाध्यक्ष कविता केरावाला, शिक्षणाधिकारी रायगड जिल्हा, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती उरण, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय, न्हावाशेवा पोलिस ठाणे आदी शासकीय विभागांना देण्यात आले होते.

सदर धरणे आंदोलन पालक शिक्षक संघर्ष समितीचे अध्यक्ष विकास कडू, पालक संघर्ष समितीचे अध्यक्ष किरण घरत, मुख्याध्यापक रमाकांत गावंड यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु होते अखेर या लढ्याला आता यश आले असून आंदोलनाला बसलेल्या सर्व शिक्षक व पालकांचे मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन आर के एफ फॉउंडेशन या संस्थेने पालक व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिले आहे. मागण्या मान्य झाल्याने शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक वर्गांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. माजी आ तथा शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख मनोहर भोईर, आ. बाळाराम पाटील, काँग्रेसचे नेते महेंद्र घरत, कामगार नेते महादेव घरत,महाराष्ट्र शिक्षक लोकशाही आघाडीचे कोकण विभाग अध्यक्ष नरसु पाटील,शेकापच्या महिला अध्यक्ष सीमा घरत, उरण तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष रेखा घरत, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, जेएनपीटी विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील, रायगड जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, मनसेचे नेते संदेश ठाकूर, पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जेएनपीटीचे माजी विश्वस्त रविंद्र पाटील, पालक संघर्ष संघटनेचे अध्यक्ष किरण घरत, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष विकास कडू, रविंद्र पाटील, योगेश तांडेल, अविनाश म्हात्रे, हसुराम घरत, रमाकांत म्हात्रे आदि विविध राजकीय, शैक्षणिक, सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सुरवातीपासून सदर संबंधित समस्या संदर्भात पाठपुरावा केला होता. या सर्वांचे आंदोलन कर्त्यांनी, पालक वर्गांनी जाहिर आभार मानले आहेत.

## विविध विकास कामांची उद्‌घाटने

गणेश नगर च्या रस्त्याचे भक्कम बांधकाम पूर्ण झालेले असून ते रायगड जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून करण्यात आले आहे. सदर रस्त्याचे मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर पाले खुर्द ते वावंजे पी एस सी जोड रस्त्याचे उद्घाटन संपन्न झाले. त्यानंतर वाकडी ते दुंदरे या रस्त्यातील २४८ ते ५०० पर्यंत चा टप्पा पूर्ण झालेला असून, त्या टप्प्याचे उद्घाटन फीत कापून व श्रीफळ वाढवून करण्यात आले. रिटघर ते खानाव या दरम्यान सिमेंट काँक्रीटचा भक्कम रस्ता बनविण्यात आलेला असून या रस्त्याचे काम देखील जिल्हा नियोजन समिती, रायगड यांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. त्यानंतर भिंगार जोड रस्त्याचे देखील मान्यवरांच्या हस्ते फीत कापून व श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले.

भिंगार ग्रामपंचायतीच्या माध्यमातून १४ वा वित्त आयोग अंतर्गत जवळपास पाच लाख रुपयांचा निधी खर्चून अंतर्गत रस्ते सिमेंट काँग्रेसचे बनविण्यात आले आहेत. आमदार बाळाराम पाटील यांच्या शुभहस्ते सदर कार्यक्रमात या रस्त्यांचे लोकार्पण देखील या समयी करण्यात आले. यावेळी आपल्या भावना प्रकट करताना शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील म्हणाले की, आमदार बाळाराम पाटील यांच्या माध्यमातून पनवेल तालुक्यातील साडेतीन जिल्हा परिषद मतदारसंघांमध्ये गेल्या सहा महिन्यात आम्ही दोन कोटी रुपयांची विकासकामे करून दाखविली आहेत. आगामी आठवड्याभरात सुमारे पावणे पाच लाखांच्या विकास कामांचे आम्ही नियोजन करणार आहोत. यंदाचे वर्षी आमदार बाळाराम पाटील जन्मदिन अभिष्टचिंतन सोहळा साजरा करणार नाहीत. महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरू आहे त्यामुळे २९ डिसेंबर रोजी ते कार्यमग्न असणार आहेत. परंतु कार्यकर्त्यांच्या प्रेमापोटी त्यांच्या शुभेच्छांचा स्वीकार करण्यासाठी ते काही काळ पक्ष कार्यालयामध्ये उपस्थित राहणार आहेत. जन्मदिनाचे औचित्य साधून विकास कामांच्या उद्घाटनाची उद्घोषणा करताना अत्यंत समाधान लाभत आहे. समाजोपयोगी कार्यातून आपले वाढदिवस साजरे करावेत ही शेतकरी कामगार पक्षाने माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना शिकवण दिली आहे.

या कार्यक्रमाला भिंगार ग्रामपंचायतीचे सरपंच ज्ञानेश्वर ठाकूर, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर पाटील, माजी चिटणीस जगन्नाथ पवार, दीपक पाटील, संदीप घोगरे, प्रकाश पाटील, बंधू मोरे, सुरेश वाघमारे, आदिनाथ गायकर, भरत पाटील, विमल पाटील, ज्ञानेश्वर पाटील, विशाल पाटील, हिरामण खेत्री, वसंता गायकर, राजेंद्र गायकर, पांडुरंग पाटील शांताराम पवार आदी मान्यवर यांच्यासह कार्यकर्ते ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विहिघर येथे नैना प्रकल्प बाधित शेतकरी उत्कर्ष समितीची सभा संपन्न

नैनाविरोधात एकत्र लढलो तर नक्कीच यश मिळेल. असे एडवोकेट विजय गडगे यांनी सांगितले. तर सांगडे येथील स्मशानभूमी भोकरपाडा येथे काढण्यात आलेलं आहे. त्यामुळे येथील प्रेत २० किलोमीटरवर आनायच का असा सवाल सुरेश पवार यांनी केला. अधिवेशनात आमदार नैनाचा प्रश्न उपस्थित करत नसतील तर रायगड मधील आमदार अधिवेशनात जातात कशाला असा सवाल अनिल ढवळे यांनी केला. नैनामुळे सध्या घर बांधताना देखील भीती वाटत आहे. सिडको धंदा करत आहे, व राजकीय पुढारी विकले गेले आहेत. त्यामुळे आपल्या गावाचा विकास आपण करू शकतो असे अनिल ढवळे यांनी भाषणात सांगितले. नैनामध्ये ज्या गावाची जागा गेली आहे त्यांना त्याच गावात जागा द्या अन्य गावात जागा कशाला देता हे सर्व बेटरमेंट चार्ज मिळण्यासाठी केले जात असल्याचा आरोप या सभेत करण्यात आला. आपला फायदा करून घ्यायचा असेल तर संघटना मजबूत झाली पाहिजे. पुन्हा एकदा हजारोंच्या संख्येने मंत्रालय समोर मोर्चा न्यायला तयार राहा असे या सभेत सांगण्यात आले. घरात बसून राहिलो तर नुकसान होईल, आपण सारे पेटून उठलो पाहिजे आणि या सरकारला घाम फोडले पाहिजे असे मत व्यक्त करण्यात आले. नैनाचा कारभार नियोजनशून्य असल्याचा आरोप राजेश केणी यानी करत गेल्या आठ वर्षापासून एकही वीट रचली नसल्याचे सांगितले. लवकरच काही गावांमध्ये शेकडो घरे तुटणार आहेत, याविरुद्ध आवाज उठवायला हवा. शासन झोपडपट्टीत राहणार्या नागरिकांना घरे देत आहेत मात्र घरात राहणार्यांना उध्वस्त करून झोपडीत राहायला पाठवणार आहे का असा सवाल राजेश केणी यानी उपस्थित केला. त्यामुळे ही नैना नकोच असा सुर पुन्हा आळविण्यात आला. नैना ही गेंड्याच्या कातडीची असल्याचे सुभाष भोपी यांनी सांगून मोर्चा काढण्याची सूचना केली.

येत्या ४ जानेवारी रोजी पनवेल येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ आंदोलन करण्यात येणार आहे. नैना प्रकल्पात शेतकर्याला ४० टक्के मिळणार नसून केवळ ३२ टक्के जागा मिळणार असल्याचे जॉईंट एम डी यांनी काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर सांगितले असल्याचे सुरेश ठाकूर यांनी सांगितले. या सभेला नामदेवशेठ फडके, सुरेश ठाकूर, वामन शेळके, सुभाष भोपी, सुरेश पवार, राजेश केणी, अनिल ढवळे, नरेंद्र भोपी, नारायण पाटील, सुनील पाटील, जगन फडके, सुदाम वाघमारे, रविन्द्र फडके, मदन गोवारी, कुंदा पवार, बाळाराम फडके, रमेश पाटील, दिलीप फुलोरे, डि के भोपी, बबन फडके, गजानन पाटील, शेखर शेळके, सुरेश पाटील, रामचंद्र फुलोरे, रामचंद्र वाघमारे यांच्यासह अनेक उपस्थित होते.

# नाताळ व नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक पर्यटन स्थळी एक्सप्रेस वे जाम

**दै.रायगड नगरी । खोपोली**



२५ डिसेंबर ला नाताळ सण असल्याने त्यानंतर नविवर्षाची सुरुवात होणार असल्याने ३१ डिसेंबर हा शेवटचा दिवस साजरा करण्यासाठी मुंबई ठाण्यासह अन्य शहरातून अनेक पर्यटक खंडाळा लोणावळा या थंड हवेच्या ठोकाणी आनंद साजरा करण्यासाठी जात असतात. त्यामुळे जलद गतीने प्रवास होणाऱ्या मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर वाहतूक कोंडी होत असते. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी वाहतूक पोलीस व आय आर बी कंपनी च्या वतीने उपाययोजना केल्या असल्या तरी खालापूर टोल नाक्यावर लांबलचक रांगा लागत असल्याने बोरघाट ही वाहनांनी जाम झाला आहे. त्यामुळे पर्यटकांना तासंतास वाहतूक कोंडीत अडकून राहावेलागल्याने इच्छित स्थळी पोहचण्याची वेळ चुकली असल्याने तासंतास महामार्गावर तासंतास ताटकळत राहावे लागले त्यानंतर धीम्या गतीने पुढे पुढे वाहने सरकत होती.

२०२१ मधील वर्षांचा शेवट होत असताना नाताळ सणामुळे सुट्या येत असल्याने वर्षाचा शेवट म्हणजे सध्या ३१ डिसेंबर या दिवसाला अधिक महत्व आल्याने अनेक कुटुंब मित्रपरिवार शासकीय अधिकारी कर्मचारी हा आनंद निवांत ठिकाणी साजरा करण्याचे बेत करीत असल्याने मुंबई तुन बाहेर पडत असल्याने मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असल्याने इच्छित ठिकाणी जाण्याच्या वेळा चुकत असल्याने एक्सप्रेस वर उपाययोजना आय आर बी व वाहतूक पोलिसांकडून सुरू आहेत. नियमित शनिवार रविवार या दिवशी ही वाहतूक कोंडी एक्सप्रेस वर होत असते त्यावेस जादा लेन सोडल्या जात असतात असे आय आर बी कंपनी कडून सांगितले जात आहे. मात्र वर्षांचा शेवट या काळात नाताळ सण व ३१ डिसेंबर या काळात सुट्या अधिक असल्याने आधी पेक्षा जादा गर्दी वाहनांची एक्सप्रेस वर होत असते.

त्यामुळे ही वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक पोलीस प्रशासन व आय आर कंपनी सज्ज झाली होती. मात्र तरीही वाहनांची संख्या अधिकच असल्याने बोरघटात सकाळ पासूनच वाहतूक कोंडीचा सामना पर्यटकांना करावा लागला त्यामुळे इच्छित स्थळी जाण्याच्या वेळा चुकल्या असल्याची चर्चा पर्यटकांमध्ये होती.

# अटल बिहारी वाजपेयी यांना भाजपच्यावतीने विनम्र अभिवादन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांची पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, माजी उपनगराध्यक्ष श्रीनंद पटवर्धन, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते शशिकांत शेळके, दौलत देशमुख, महिला मोर्चाच्या शहर अध्यक्षा वर्षा नाईक, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, ज्येष्ठ कार्यकर्त्या सुहासिनी केकाणे, अमरीश मोकल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अटलजींच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी जयंतीनिमित्त प्रत्येक वर्षी भारतात 'गुड गवर्नेंस डे' अर्थात सुशासन दिन साजरा केला जातो. हा दिवस पूर्णपणे अटल बिहारी वाजपेयी यांना समर्पित असतो. अटल बिहारी वाजपेयी एक प्रतिभासंपन्न असं व्यक्तिमत्व होतं. त्यांनी भारताचं नाव अनेक क्षेत्रात मोठं केलं. २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या सन्मानार्थ प्रत्येक वर्षी २५ डिसेंबर रोजी 'गुड गवर्नेंस डे' साजरा करण्याची घोषणा केली होती. आज देखील यानिमित्ताने अटलबिहारी वाजपेयींना देशभरात अभिवादन केले जात आहे. तसेच विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# २८ डिसेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दिव्यांगाच्या प्रमाणपत्र वाटप तपासणी शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिव्यांगाचे प्रमाणपत्र वाटप तपासणी शिबीर २८ डिसेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे होणार आहे. तरी मोठ्या संख्येने या शिबिराकरिता उपस्थित राहून त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

दिव्यांगाना प्रमाणपत्र घेण्यासाठी जिल्हा रुग्णालय, अलिबाग येथे जावे लागत होते. पनवेल वरून अलिबाग साधारणपणे ६० किलोमीटर आहे. त्यामुळे त्यांना बराच दूरवरचा प्रवास करावा लागत होता.

त्याना येण्या-जाण्याचा पण त्रास होत होता हे सर्व विचारात घेऊन जिल्हा प्रशासनाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे दिव्यांगाच्या प्रमाणपत्र वाटप संदर्भातील तपासणीचे शिबीर उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे होणार आहे. यापुढे ते पनवेल येथे होणार आहे. या संदर्भातील पहिले शिबिर हे येत्या २८ डिसेंबर रोजी उपजिल्हा रुग्णालय, पनवेल येथे आयोजित करण्यात आलेले आहे. तरी सर्व दिव्यांग बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने या शिबिरा करिता उपस्थित राहून त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# जबरीने चेन खेचून पळणाऱ्या आरोपीस रंगेहाथ पकडले

**दै.रायगड नगरी । पनवेल**



नवीन पनवेल येथून एक ७० वर्षीय महिला पायी चालत जात असताना एका इसम सदर महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन जबरीने खेचून पळून जात असताना स्थानिक नागरिकांच्या मदतीने खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या पथकाने सदर इसमास मुद्देमालासह पकडल्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

आरोपीचे नाव मंगेशकुमार शौकीन धिंग्या उर्फ मंगू, राह. वाल्मिकीनगर, पनवेल यास अटक करण्यात आली आहे व त्याच्याकडून ७५,०००/- एक सोन्याची चेन सुमारे दीड तोळे वजनाची हस्तगत करण्यात आली आहे. या आरोपीस पकडणे कामी मदत करणारे जागरूक नागरिक आनंद समलदार सिंग व सुखदेव रामभाऊ पाटोळे यांना खांदेश्वर पोलीस ठाणे तर्फे प्रशंसापत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे. याबाबत पुढील तपास व.पो.नि. सुभाष कोकाटे व गुन्हे पो.नि. वैशाली गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.निरी. प्रविण पांडे हे करीत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# अमृत महोत्सवी वर्षात ; सार्वजनिक आरोग्याची काळजी घेणारे शासन

राज्यात कोविड संसर्ग उद्भवल्यानंतर सुरुवातीच्या काळात फक्त तीन कोविड-१९ चाचणी प्रयोगशाळा होत्या. आता सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आरटीपीसीआर प्रयोगशाळा सुरू झाल्या आहेत. राज्यातील शासकीय संस्थांमधील सर्व कोविड-१९ चाचण्या मोफत करण्यात आल्या आहेत, आजपर्यंत २३६ आरटीपीसीआर प्रयोगशाळांसह २९६ आण्विक चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या असून, त्यापैकी जवळजवळ अर्ध्या सार्वजनिक संस्थांमध्ये प्रत्येक किमान एक सरकारी आरटीपीसीआर प्रयोगशाळा उपलब्ध करून देण्यात आली आहे. राज्यात आजपर्यंत ५.८ कोटींपेक्षा जास्त चाचण्या केल्या असून, दैनिक आरटीपीसीआर चाचणी क्षमता १.१६ लाख नमुन्यांपेक्षा जास्त आहे. वैद्यकीय शिक्षण विभागांतर्गत २० समर्पित कोविड रुग्णालये स्थापन करण्यात आली आहेत. कोविड-१९ साठी सध्या ८ हजार २७४ बेड निर्धारित असून, त्यापैकी ७ हजार ७८८ (९५ टक्के ) ऑक्सिजनयुक्त बेड, तर २ हजार १४७ (२६ टक्के ) आयसीयू बेड आहेत. कोविड-१९ साठी एकूण २ हजार ५४४ व्हेंटिलेटर आणि ६७ डायलिसिस मशीन्ससुद्धा ठेवण्यात आली आहेत. विभागाने १.५ लाखांहून अधिक गंभीर कोविड रुग्णांवर ८० टक्के पेक्षा जास्त पुनर्प्राप्ती दराने उपचार केले आहेत. विभागांतर्गत बालरोग कोविड-१९ साठी एकूण १ हजार ३६१ बेड निर्धारित केले असून त्यापैकी ५४७ आयसीयू बेड आहेत. कोविड-१९ साठी एकूण २१६ व्हेंटिलेटर्स विद्यमान ४० लिक्विड मेडिकल उपलब्ध करण्यात आले आहेत. तसेच कोविड-१९ च्या व्यवस्थापनासाठी ऑक्सिजन प्लांट्ससह कोविड-१९ च्या व्यवस्थापनासाठी अतिरिक्त ४० पीएसए प्लांट्स तयार करण्यात आले आहेत. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये म्युकरमायकोसिसचे एकूण २० हजार पेक्षा जास्त रुग्णांची तपासणी पूर्ण झाली आहे. तसेच ३ हजाराहून अधिक रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यापैकी २,५०० (७५ टक्के) रुग्णांना. रुग्णांवर यशस्वीपणे शस्त्रक्रिया करून २,५०० पेक्षा जास्त रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचा विविध चाचण्यांमध्ये पूर्णपणे सहभाग आहे. तसेच विविध वैद्यकीय महाविद्यालयांचा लस चाचण्या , लस सुरक्षा आणि कार्यक्षमतेबाबत अचूक आणि विश्वासार्ह डेटा सुरक्षित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून मुंबईच्या सेंट जॉर्जेस हॉस्पिटल येथे १०० खाटांचे आयसीयू वॉर्ड तयार करण्यासाठी २० कोटी रुपये, तर कोल्हापूर, अंबाजोगाई आणि नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये यंत्र खरेदीसाठी २० कोटी रुपये देण्यात आले आहेत. बारामती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला प्रथम वर्षाकरिता म्हणजेच सन २०१९-२० साठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह महाविद्यालय सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. नंदूरबार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेशास मान्यता देण्यात आली आहे. सिंधुदुर्ग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व संलग्नित ५०० रुग्ण खाटांचे रुग्णालय केंद्र शासनाच्या मान्यतेनंतर सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आली आहे. उस्मानाबाद येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलगित ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे ५० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या (बी.एस्सी.) महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित ४३० रुग्ण खाटांचे रुग्णालय व वैद्यकीय पदव्युत्तर पदवी संस्था स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. बारामती (पुणे) येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व संलग्नित १०० रुग्ण खाटांचे आयुर्वेद रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रुग्णालय स्थापन करण्यासाठी सार्वजनिक खासगी भागीदारी धोरण ठरवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील तृतीयक आरोग्य सेवेसाठी पायाभूत सुविधा आणि वैद्यकीय शिक्षण सुविधांच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाचे रणनीतिक सल्लागार म्हणून आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेला (आयएफसी) करारबद्ध करण्यासाठी करार करण्यात आला. शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनात दरमहा १० हजार रुपये. वाढ करण्यात आली असून, शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या (निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतना-तही दहा हजार रुपये वाढ करण्यात आली आहे. याशिवाय राज्यातील शासकीय वैद्यकीय/दंत/ आयुर्वेद महाविद्यालयातील आणि शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील आंतरवासिता प्रशिक्षणार्थींच्या विद्यावेतनात ६ हजार रुपयांवरून ११ हजार रुपये वाढ करण्यात आली आहे. सन २०१९ -२० या शैक्षणिक वर्षी एसईबीसी आणि ईडब्ल्यूएस आरक्षणामुळे बाधित होऊन खासगी विनाअनुदानित वैद्यकीय व दंत अभ्यासक्रमास प्रवेशित झालेल्या खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती देण्यात येणार आहे, यासाठी सन २०२१-२२ साठी २५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. या शुल्कपूर्तीचा लाभ डिबीटी पद्धतीने होणार आहे. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरीता प्रदेशनिहाय (मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्र) ७० टक्के आणि राज्यस्तरावर ३० टक्के जागांचे वाटप करण्यात येत होते. त्यानुसार संबंधित प्रदेशातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या जागांपैकी ७० टक्के जागा त्याच प्रदेशातून १० वी व १२ वी उत्तीर्ण उमेदवारांकरिता राखीव ठेवण्यात येत होत्या, तर उर्वरित ३० टक्के जागा राज्यातील सर्व उमेदवारांकरिता उपलब्ध करण्यात येत होत्या. आरोग्य विज्ञान: अभ्यासक्रमांच्या प्रवेशांकरिता गुणवत्तेनुसार समान संधी प्राप्त होण्यासाठी आणि सदर प्रादेशिक आरक्षण रद्द करण्याबाबत लोकप्रतिनिधी आणि विद्यार्थी यांच्याकडून सातत्याने मागणी होत होती . त्यानुसार ७ सप्टेंबर २०२० रोजी अधिसूचना काढण्यात आली आहे. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता लागू असलेले प्रादेशिक आरक्षण (७०:३० कोटा पद्धत) रद्द करण्यात आले असून, आता राज्यस्तरावर गुणवत्तेनुसार आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येत आहेत.

शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालयात तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत सहायक प्राध्यापक (गट-ब) या संवर्गातील अध्यापकांना नियमित वेतनश्रेणी ऐवजी १ लाख १० हजार रुपये (गोंदिया,चंद्रपूर, धुळे, यवतमाळ, अंबाजोगाई व नंदुरबार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच आरोग्य पथक, पालघर येथील सहायक प्राध्यापक) व १ लाख रुपये (उर्वरित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व इतर पासून देण्यात येत आहे. संस्थांमधील सहायक प्राध्यापक) या दराने एकत्रित मानधन जानेवारी २०२१ संचालक, सह संचालक (वैद्यकीय), अधिष्ठाता (वैद्य), प्राध्यापक (वैद्य), ३०४ पदांच्या भरतीची कार्यवाही सुरू आहे. मुख्य प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी इत्यादी संवर्गातील एकूण नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंध-दुर्ग व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, साताराकरिता पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या सक्षमीकरणासाठी संचालनालयाच्या स्तरावर १९ नियमित पदे व बाह्यस्त्रोताद्वारे सेवा देण्यासाठी १४ अशी ३३ पदे तसेच प्रादेशिक स्तरावरील सहसंचालक कार्यालयासाठी २२ नियमित बाह्यत्रोताद्वारे सेवा देण्यासाठी ६ अशी एकूण २८ पदे निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला. या पदांमध्ये आयुक्त (वैद्यकीय शिक्षण) या पदाचा अंतर्भाव असून, त्यावर भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रधानमंत्री स्वास्थ्य सुरक्षा योजनेंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अकोला, यवतमाळ, लातूर व औरंगाबाद येथे अतिविशेषोपचार रुग्णालय सुरू करण्यासाठी प्रथम टप्प्याकरिता एकूण ८८८ पदे निर्माण करण्यास मान्यता. दुरस्थ भागात स्थापन झालेल्या व होणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय करीता गट-अ व गट ब मधील पदे भरण्यासाठी संख्यानिहाय स्वतंत्र पदमरती धोरण लागू करण्यास मान्यता दिल्यामुळे अशा भागातील संस्था पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यास मदत होईल.

मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लिमिटेड, हैद्राबाद यांचे कोविड -१९ या साथरोगावरील कोवॅक्सिन लसीच्या उत्पादनाचे तंत्रज्ञान वापरून या लसीचे उत्पादन हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळामार्फत करण्यात येणार असून, या प्रकल्पास केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या अख्यारितील जैवतंत्रज्ञान उद्योग संशोधन सहायता परिषद् (बीआयआरएसी) यांच्याकडून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या १५४ कोटी रुपयांच्या लस निर्मिती प्रकल्पास तसेच त्यास वित्तीय साहाय्य करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मेडिकल ऑक्सिजनची अखंडित निर्मिती करण्याकरिता व उत्पादन केलेला मेडिकल ऑक्सिजन पूर्ण क्षमतेने राज्यातील सर्व कोविड रुग्णालय यांना नियमित पुरवठा होण्याबाबत राज्यातील अन्न व औषध प्रशासनाच्या नियंत्रण कक्षामध्ये समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर राज्यात टास्क फोर्स गठीत करण्यास मान्यता देण्यात आली असून कोविड १९ या साथीच्या रोगाकरिता आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी विषयक मार्गदर्शक सूचना त्याचप्रमाणे कोविड १९ आयुष चिकित्सा पद्धतीच्या उपचारासंदर्भात संशोधन प्रकल्पास मान्यता देण्याबाबत कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या आयुष मंत्रालयाच्या राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळांतर्गत राष्ट्रीय औषधी वनस्पती संस्था मौजे आडाळी, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग येथे स्थापन करण्यासाठी जमिन हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील खासगी शासन अनुदानित आयुर्वेद व युनानी महाविद्यालयातील अध्यापकीय संवर्गासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार सातव्या वेतन आयोगाच्या तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत. तसेच शासनमान्य वेतन संरचना करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पदावरील कर्मचाऱ्यांसाठी सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार सुधारित विभागाच्या अधीनस्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांना कोविह-१९ उपाययोजनेंतर्गत पीएम केअर फंड व सीएसआर च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात प्राप्त झालेल्या विविध स्वरूपाची यंत्रसामग्री व उपकरणे तसेच ज्या यंत्रसामग्रीचे देखभाल दुरुस्तीचे करार करण्यात आलेले अशी यंत्रसामग्री, उपकरणे इत्यादींच्या दुरुस्ती व देखभालीसाठी कोविड १२ प्रादुर्भाव कालावधीत संस्थास्तरावर प्रत्येकी एक बायोमेडिकल इंजिनिअरची १२० दिवसांसाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी मान्यता. कोविड केंद्रामध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी मानक कार्यप्रणाली तयार करण्याच्या अनुषंगाने सहयोगी प्राध्यापक, औषधवैद्यकशास्त्र विभाग, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाकडून पाच सदस्यीय समिती गठित करण्यात आली होती त्यानुसार राज्यातील कोविड केंद्रामध्ये महिलांच्या सुरक्षिततेसाठी समितीने शिफारस केल्यानुसार मानक कार्यप्रणाली निश्चित करण्यात आली आहे.

म्युकरमायकोसिस आजाराच्या अनुषंगाने मधुमेह, कमी प्रतिकार शक्ती असलेले, कर्करोग इत्यादी व्याधींनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींना कोविड झाल्यास वेळेत व योग्य उपचार होण्याच्या अनुषंगाने सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश १ ९ एप्रिल २०२१ अन्वये महाराष्ट्र राज्यातील कोविड बाधितांच्या वाढत्या रुग्णसंख्येचे प्रमाण बघता CSIR INSTITUTE OF CSIR GENOMICS INTEGR- TIVE BIOLOGY या संस्थेसह कोविड बाधितांच्या Genome sequencing साठी सामंजस्य करार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर संस्थेशी संलग्नित असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय व अनुसंधान केंद्र, नागपूर या संस्थेचे श्रेणीवर्धन करून तेथे १७ पदव्युत्तर, ११ अतिविशेषोपचार अभ्यासक्रम, रुग्णालयीन प्रशासन/व्यवस्थापन विभाग व दंत बाह्यरुग्ण विभाग तसेच अभ्यासक्रमांशी संबंधित ६१५ खाटांचे रुग्णालय सुरू करण्यास व संस्थेचे नामाभिधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर अतिविशेषोपचार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्था असे करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. ऑक्सिजनच्या वितरण व पुरवठ्याची जबाबदारी निश्चित करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या अध्यक्षतेखाली ऑक्सिजन ऑडिट उपसमिती गठित करण्यात आली आहे. एकूणच सार्वजनिक आरोग्याची सर्वाधिक काळजी घेणारे शासन म्हणूनच या शासनाचा उल्लेख करणे अधिक संयुक्तीक ठरेल!

**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

## बंद असलेले कोविड हेल्पलाईन नंबर अणि बेड व्यवस्थापन नंबर तातडीने सुरु करण्याची कामोठे फोरमची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देशामध्ये ओमिक्रोन विषाणू चा प्रसार वेगाने होत असून कोविड तिसऱ्या लाटेचा अंदाज तंज्ञानी व्यक्त केला आहे . पनवेल महापालिका क्षेत्रात सुद्धा कोरोनाचे रुग्ण आढळून आल्याचे महापालिका प्रसिद्ध करत असलेल्या प्रेस नोट मधून दिसून येत आहे . अशातच मुंबई शहराच्या जवळ असल्यामुळे अनेक परदेशी नागरिकांची रेलचेल पनवेल परिसरात दिसून येते . त्यामुळे आपल्या शहराला सुद्धा ओमिक्रोम विषाणूचा संभाव्य धोका आहे .

पण दुर्दैवाने महापालिकेचे कोविड व्यवस्थापनकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. नागरिकांना कोविड संदर्भात माहिती तसेच मदत मिळण्याकरीता महापालिकेच्या प्रेस नोट मध्ये प्रसिद्ध करत असलेला टोल फ्री नंबर १८००२२७७०१ बंद असल्याचे आमच्या निर्दर्शनास आले आहे . तसेच महापालिका प्रेस नोट मध्ये प्रसिद्ध करत असलेले कोविड रुग्णालय बेड व्यवस्थापन हेल्पलाईन नंबर ८९२८९३१०३४/८९२८९३१०४९ सुद्धा बंद असल्याचे आमच्या निर्दर्शनास आले आहे.याबाबत नागरिकांकडून अनेक तक्रारी कामोठे कॉलोनी फोरम तर्फे प्राप्त झालेल्या आहेत.

ह्यासंदर्भात कामोठे कॉलोनी फोरमचे अध्यक्ष मंगेश अढाव अणि सेक्टर समन्वयक उमेश गायकवाड ह्यांनी पनवेल महापालिका आयुक्त तसेच मुख्य वैद्यकीय अधिकारी ह्यांची भेट्न लेखी निवेदनाद्वारे सर्व हैल्पलाईन नंबर तातडीने सुरु करण्याची मागणी केली. ह्यावेळी आरोग्य अधिकारी ह्यांनी स्वत हैल्पलाईन नंबर बंद असल्याचे तपासून पहिले. ह्यावेळी मुख्य आरोग्य अधिकारी ह्यांनी कामोठे कॉलोनी फोरमच्या तक्रारीची दखल घेत बेड व्यवस्थापन नंबर पुढील



काही तासातच सुरु करण्याचे आदेश संबंधितांना दिले. तसेच टोल फ्री कोविड हेल्पलाईन नंबर साठी कॉल सेंटर चे काम लवकर पुर्ण करुन पुढील दोन दिवसात टोल फ्री हेल्पलाईन नंबर सुरु करणार असल्याचे सांगितले. ह्यावेळी कोविड रुग्ण मिळाल्यानंतर वेळेत सोसायटींमधे सैनिटायझर फवारणी करण्याची मागणी फोरम तर्फे करण्यात आली.

## एकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कंटेनरला यु टर्न घेताना पाठीमागचा बॉक्स चालकाच्याच केबिनवर आढळल्याने त्यात चालकाचा मृत्यू झाला आहे. पनवेल तालुका पोलीस स्टेशनच्या हद्दीत प्रीती लॉजिस्टिक, आजीवली या ठिकाणी ही घटना घडली आहे. आशिष शिव प्रताप सिंग (वय २८, उत्तर प्रदेश) असे मृत चालकाचे नाव आहे.

अशीष सिंग हा त्याच्या ताब्यातील कंटेनर एमएच ४६ एच ४८६३ हा नवकार लॉजिस्टिक कंपनी मेन गेट समोर रस्त्यावर यु टर्न घेत होता. जाग्यावर यु टर्न घेत असताना त्याच्या पाठीमागील बॉक्स त्याच्याच कॅबिनवर आदळला.

या झालेल्या अपघातात चेपून आशिष सिंग याचा मृत्यू झाला. याची नोंद पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## नववर्षाच्या स्वागतासाठी माथेरान सज्ज

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी माथेरान पर्यटकांनी गजबजून गेले असून नगरपरिषदे मार्फत सुयोग्यप्रकारे नियोजन करण्यात आले आहे. पोलीस प्रशासनाने सुध्दा कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी बारकाईने लक्ष वेधले आहे.वर्षाचा हा शेवटचा व्यावसायिक हंगाम असल्याने पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी व्यापारी, दुकानदार छोटे मोठे स्टोल धारक सज्ज झालेले आहेत.

माथेरानचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर पर्यटकांच्या स्वागतासाठी सांताक्लॉजच्या वेशात नगरपरिषदेचा कर्मचारी असून वेगवेगळ्या बाहुल्या सुध्दा बालगोपालांचे खास आकर्षण ठरत आहेत.आकर्षक विद्युतरोषणाई,रंगीबेरंगी फुग्यांच्या कमानी आणि लहान लहान मुलांना चॉकलेटचे वाटप सांताक्लॉज करीत आहेत त्यामुळे यांच्यासोबत मोबाईल कॅमेऱ्यात फोटो काढण्यासाठी पर्यटक गर्दी करतांना दिसत आहेत.यासाठी नगरपरिषदेचे गटनेते प्रसाद सावंत आणि शालिमार होटेलचे व्यवस्थापक बदलापूर येथील उद्योजक संतोष चौधरी यांच्या स्वखर्चाने आणि पुढाकाराने केलेले आहे. वनखात्याच्या मार्फत गाड्यांची पार्कींग व्यवस्था चोखपणे पार पाडली जात आहे. पर्यटक घोडेस्वारीचा आंनद घेत असून आबालवृद्ध मंडळी हातरीक्षा मधून पॉईंट्सची सैर करीत आहेत. बाजारपेठेत चिक्की, चपला तसेच खेळणी खरेदीसाठी गर्दी पहावयास मिळत आहे. तर एखाद्या स्टॉलवर सरबत आणि या गुलाबी थँडीच्या मोसमात भाजलेल्या मक्यांना तसेच गरमागरम भजी वडापाव खाण्यासाठी खवय्यांची झुंबड उडाली आहे.एकंदरीतच माथेरानला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.




### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील मुळ मालक / भोगवटाधारक १) बाळाराम महादू म्हात्रे, २) शकुंतला धर्मा म्हात्रे, ३) अर्चना जनार्दन ठोंबरे, ४) अमृता धर्मा म्हात्रे उर्फ अमृता अजित पाटील, ५) भारती भरत म्हात्रे, ६) आरती भरत म्हात्रे उर्फ आरती शैलेश पाटील, ७) किर्ती भरत म्हात्रे उर्फ किर्ती ज्ञानेश्वर म्हसणे, ८) रोशनी भरत म्हात्रे उर्फ रोशनी रत्नाकर डाऊर, रा.मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड यांचे हिश्श्याची, मालकीची, ताबेकब्जातील, वहिवाटीतील तसेच त्यांचे नावे सातबारा सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जिरायत जमीन आमचे अशिलांनी त्यांच्याकडून कायम स्वरुपात विकत घेण्याच्या विचारात आहेत. सबब सदरहू मिळकतीचे कोणतेही नोंदणीकृत दस्त करण्यापूर्वी सदर मिळकतीमधील मुळ मालक / भोगवटाधारकांचे असलेले मालकी हक्क तपासण्याकरिता आमचे अशिलांचे वतीने सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.क्रं. | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १०८ | १ | जिरायत ००.४८.०० पैकी ००.२८.८० विक्री क्षेत्र | ०२.९५ |

एकूण क्षेत्र ००.४८.०० गुंठे पैकी १) बाळाराम महादू म्हात्रे, २) शकुंतला धर्मा म्हात्रे, ३) अर्चना जनार्दन ठोंबरे, ४) अमृता धर्मा म्हात्रे उर्फ अमृता अजित पाटील, ५) भारती भरत म्हात्रे, ६) आरती भरत म्हात्रे उर्फ आरती शैलेश पाटील, ७) किर्ती भरत म्हात्रे उर्फ किर्ती ज्ञानेश्वर म्हसणे, ८) रोशनी भरत म्हात्रे उर्फ रोशनी रत्नाकर डाऊर यांचे ००.२८.८० गुंठे क्षेत्राचे विक्रीबाबत जाहीर नोटीस

तरी वर नमूद जमिनीवर / मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत आपला हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासंहीत खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून नमूद मिळकतीबाबतचा जमीन मालक १) बाळाराम महादू म्हात्रे, २) शकुंतला धर्मा म्हात्रे, ३) अर्चना जनार्दन ठोंबरे, ४) अमृता धर्मा म्हात्रे उर्फ अमृता अजित पाटील, ५) भारती भरत म्हात्रे, ६) आरती भरत म्हात्रे उर्फ आरती शैलेश पाटील, ७) किर्ती भरत म्हात्रे उर्फ किर्ती ज्ञानेश्वर म्हसणे, ८) रोशनी भरत म्हात्रे उर्फ रोशनी रत्नाकर डाऊर, यांचे मालकी हक्क हे निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत गृहीत धरुन त्याप्रमाणे सदरहू मिळकती आमचे अशिल त्यांचे नावे नोंदणीकृत खरेदीखताद्वारे कायमस्वरुपी त्यांचा वरील जमिनीमधील हिस्सा हस्तांतरीत करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे हे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत, असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २४/१२/२०२१

**सही/-**
**श्री.समाधान आबासाहेब काशिद**
**वकील उच्च न्यायालय**
**ऑफिस नं.६, तळ मजला,**
**श्री. बालाजी कृपा सोसायटी, भूखंड क्रं.२८,**
**सेक्टर नं.२२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९**
**मो.नं.९०९६३९९०२०**



मा.मुजावर साहेब कोर्ट
अर्जदारतर्फे ॲड.शिवराज ग. राणे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८६०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०२/२०२२

कै.विश्वनाथ माधव भट मयतचे कायदेशीर वारसदार
१) श्रीमती.विलासिनी विश्वनाथ भट
वय : ८२ वर्षे, धंदा : गृहिणी / वयोवृद्ध
२) श्री.नरेश विश्वनाथ भट
वरू : ५५ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.संजय विश्वनाथ भट
वय : ४७ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.फ्लॅट नं.१०, ललत को.ऑप.हौसिंग सोसायटी,
लेफ्टनंद दिलीप गुप्ते रोड, शिवाजी पार्क जवळ,
मुंबई, महाराष्ट्र-४०००१६ — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. विश्वनाथ माधव भट यांचा मृत्यू दि.२४/१०/२०२० रोजी माहिम (पश्चिम), मुंबई, महाराष्ट्र ४०००१६ रोजी झाला. त्यांचे मृत्यूपश्चात खालील वर्णन केलेल्या मिळकतीत असलेल्या त्यांच्या सामाईक हिश्श्याबाबत वारस असलेबाबतचा वारस दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

१) कै.विश्वनाथ माधव भट हे त्यांच्या हयातीत विकसित भूखंड क्र.३ आणि ५, रोड नं.८, सेक्टर १२, क्षेत्र २४० चौ.मी., नवीन पनवेल व त्यावरील सिडको प्रशासनाच्या मान्यतेने बांधण्यात आलेला ७४.९९ चौ.मी. आकारमानाचा बंगलो धारण करीत होते. अर्जदार हे कै.विश्वनाथ माधव भट यांचे वरील मिळकती संबंधात कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या या हक्कांबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्कांबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार हे कै. विश्वनाथ माधव भट यांच्या वारस असल्याचे शाबित झाल्यास त्यास वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.२३/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — (कोर्टाचा शिक्का) — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


## भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलजी वाजपेयी यांना नागोठण्यात आदरांजली



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे येथील भाजपाच्या जनसंपर्क कार्यालयात शनिवार दि. २५ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलजी वाजपेयी यांची ९७ व्या जयंतीच्या निमित्ताने भाजपच्या कार्यकर्त्यांनी आदरांजली वाहिली.

यावेळी भाजपच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षा श्रेया केदार कुंटे, रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, रोहा तालुका उपाध्यक्ष संतोष लाड, तालुका शिक्षण सेल अध्यक्ष अशोक अहिरे, नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी, नागोठणे शक्ती प्रमुख सिराजभाई पानसरे, नागोठणे शहर सरचिटणीस तिरतराव पोलसानी, जेष्ठ कार्यकर्ते विवेक रावकर, सुरेश जैन, प्रमोद गोळे, हिरामण तांबोळी, मोहन लाड, दक्षिण रायगड महिला मोर्चा मिडिया संयोजिका प्रियांका रुपेश पिंपळे, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस माधुरी विवेक रावकर, महिला मोर्चा नागोठणे शहर अध्यक्ष शितल संजय नांगरे, महिला मोर्चा शहर सरचिटणीस सोनाली पडवळ, उत्तर भारतीय सेल नागोठणे शहर अध्यक्षा सोनी पांडे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : जांभिवली तर्फे वनखळ, ता.खालापूर, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत.

**गाव : जांभिवली तर्फे वनखळ, ता.खालापूर, जि.रायगड**

| अ.क्र. | स.नं. | क्षेत्र | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|
| ०१ | ७६ | ०-१५-२० | ०-०१-५० | ०.२२ |

वरील जमिनीचे मालक श्री.रवींद्र विठ्ठल शेलकर व इतर यांचे ताबेकब्जात व वहिवाट असलेली वरील मिळकत ही अब्दुसमी अस्लम मुन्शी, अमान अस्लम मुन्शी रा.पनवेल यांनी खरेदीने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

तरी सदर मिळकतीबाबत होणाऱ्या व्यवहारास कोणीही व्यक्तीची / संस्थेची कोणत्याही स्वरुपाची हरकत, दावा, तक्रार, दावा, वहिवाटी हक्क, हितसंबंध, खरेदी, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, भाडेकरार, वारसा, हक्क, पोटगी, लिज, सबलिझ, लिएन, सदर मिळकतीतून जाण्या-येण्याचे वहिवाटी अथवा इजमेंटचे हक्क इत्यादी अगर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी आपली हरकत लेखी स्वरुपात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर कळवावी. या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे समजून आम्ही सदर वर मिळकतीच्या मालकाशी खरेदीचा व्यवहार पूर्ण करू. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार आल्यास ती आमचेवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अब्दुससमी अस्लम मुन्शी**
**अमन अस्लम मुन्शी**
**रा.निकी टॉवर, रुम नं.३०१/३०२,**
**सी विंग, पनवेल, जि.रायगड**

# संक्षिप्त...

## दागिने खेचून पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटार सायकलवरुन आलेल्या दोघा अज्ञात इसमांनी आज सकाळी मॉर्निंग वॉक करीत असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील दागिने खेचून पसार झाल्याची घटना घडली आहे.

शहरातील मोराज सोसायटी परिसरात सुमेधा कुशवाह (४५) या मॉर्निंग वॉक करीत असताना मोटार सायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने खेचून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चिखले रेल्वे ब्रिजच्या खाली पनवेलकडे जाणार्या रस्त्यावर कोन गाव येथे ४० ते ४५ वर्षे अनोळखी इसमाचा मृतदेह पनवेल तालुका पोलिसांना सापडला आहे.

या ईसमाची उंची साडेपाच फूट, रंग सावळा, नाक सरळ, डोक्याचे केस वाढलेले, दाढीचे केस वाढलेले आहेत. तालुका पोलिस याच्या नातेवाइकांचा शोध घेत आहेत. या ईसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक धनश्री पवार यांच्याशी संपर्क साधावा.

## देऊ दंत यांचे वृद्धापकाळाने निधन

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

सुधागड तालुक्यातील सिध्देश्वर खुर्द येथील देऊ सखाराम दंत यांचे वयाच्या ८० व्या वर्षी गुरुवार (दि.२३) रोजी पहाटे १.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. कै. दंत यांच्यावर सकाळी ११.३० वा. सिध्देश्वर येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी त्यांच्या अंत्ययात्रेला रोहा, सुधागड, माणगाव, तालुक्यातील समाज बांधवासह आदिवासी समाजही मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कै.दंत यांनी आपले संपुर्ण आयुष्य हे शेती व्यवसाय करण्यात घालवले. त्यांचे येवढे वय असुनसुद्धा अजुनही शेतावरती जाऊन मेहनत करण्याची चिकाटी त्यांच्या अंगी दिसुन येत होती. आपल्या समाजासह आदिवासी समाजबांधवांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. स्वभावाने अत्यंत प्रेमळ व मनमिळाऊ असलेल्या दंत यांनी आपल्या सर्व मुलांना चांगल्या पध्दतीने व्यवसायाचा मार्ग दाखवुन दिला. त्यांनी वेळोवेळी संपूर्ण कुटुंबाला केलेले बहुमुल्य मार्गदर्शन हे नेहमीच सर्वांच्याच लक्षात राहिल.

# रूम स्वस्तात मिळेल असे सांगून केली दोन लाख ८० हजार रुपयांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बिल्डिंग बांधण्यासाठी बांधकाम विभागाच्या परवानगी असल्याचे खोटे सांगून आणि रूम लवकरात लवकर बुक केल्यावर तूम्हाला स्वस्तात मिळेल असे सांगून दोन लाख ८० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. खांदेश्वर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लालबाग, मुंबई येथील विठ्ठल दिगंबर गवंडळकर हे २०११ मध्ये स्वामी समर्थ ग्रुप ऑफ कंपनीचे बांधकाम व्यवसायिकांच्या कार्यालयात गेले. यावेळी दीपक शिंदे आणि अनिल बापेरकर यांनी विचुंबे गाव येथे नवीन बांधकाम साईट चालू असल्याचे सांगितले. यावेळी दोन वर्षात ताबा देणार असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर वन बीएचके रूम घेण्याचे ठरले. यावेळी सर्व विभागांच्या बांधकाम परवानगी घेतली असल्याचे बांधकाम व्यावसायिकांकडून सांगण्यात आले. व प्रोजेक्टमध्ये तुम्ही आत्ता बुक केले तर ते स्वस्तात मिळेल असे सांगण्यात आले. त्यामुळे दीपक शिंदे व अनिल बापेरकर यांना दोन लाख ८० हजार रुपये चेक स्वरूपात देण्यात आले. दोन वर्षात त्यांनी इमारतीचे ३ स्लॅबचे बांधकाम केले. मात्र बांधकाम पूर्ण केले नाही. त्यावेळी विचारणा केली असता लवकरच बांधकाम पूर्ण होईल असे आश्वासन देण्यात आले. सात वर्ष पूर्ण झाली तरीदेखील इमारतीचे बांधकाम पूर्ण न झाल्याने त्यांनी भरलेले पैसे परत मागितले. यावेळी त्यांनी चेक दिले, मात्र ते चेक बाउन्स झाले. गुंतवलेले पैसे परत कधी मिळणार याबाबत विचारणा केली असता ते उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. त्यामुळे स्वामी समर्थ ग्रुप ऑफ कंपनीचे प्रोप्रायटर दीपक शिंदे व अनिल बापेरकर यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ओमायक्रोनचा धोका लक्षात घेऊन नागरिकांनी सतर्क राहण्याचे तहसीलदार घारे यांचे आवाहन

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



कोरोना महामारीनंतर येऊ घातलेल्या ओमायक्रोनच्या युद्धात स्वतःचा बचाव करायचा असेल तर जनतेनी प्रशासनाला सहकार्य करावे आणी प्रशासन वेळोवेळी राबवत असलेल्या लसीकरण मोहिमेला सहकार्य करत आपल लसीकरण करून घेणं तितकंच महत्त्वाच असल्याचे आवाहन आंबेत, संदेरी येथे संपन्न झालेल्या लसीकरण मोहीम सभेत तहसीलदार समीर घारे यांनी केले. याप्रसंगी बोलताना तहसीलदार समीर घारे यांनी सांगितले कि आंबेत, संदेरी भागात अद्याप ज्यांनी एकही डोस घेतलेला नाही अशा व्यक्तींना विशेष समज पत्र देऊन लसीकरण घेण्यास विशेष मोहीम राबविली जाईल असे सांगण्यात आले.

म्हसळा तालुक्यातील अनेक लसीकरण केंद्रावर तहसीलदार घारे यांनी विशेष भेट देत तेथील अहवाल पाहून संबंधित विभागातील पोलीस पाटील, सरपंच, ग्रा. सदस्य, ग्रामसेवक, डॉक्टर, आरोग्य सेवक, तलाठी यांच्या माध्यमातून गाव वाडीवर जाऊन विशेष समज पत्र देण्याचं आवाहन केलं, जनतेची सुरक्षा हीच आमची जबाबदारी म्हणत त्यांनी लसीकरणाबाबत गैरसमज पसरवाणाऱ्या व्यक्तींवर देखील कारवाई केली जाईल असे सक्त ताकीद देऊन सांगण्यात आले.

खामगाव PHC अंतर्गत येणाऱ्या २६ गावांमध्ये एकूण ५०६ नागरिकांनी एक ही डोस घेतलेला नाही अशी माहिती संबंधित खामगाव विभागातील अधिकारी वर्गाकडून प्राप्त झाली आहे.

तरी ज्या नागरिकांनी अद्याप लसीकरण केलेले नाही त्यांनी शासनास सहकार्य करून आपलं लसीकरण करून घ्यावे, अन्यथा शासनाला देखील अश्या व्यक्तींना कितपत सहकार्य करावे असा विचार करावा लागेल. यावेळी आरोग्य अधिकारी गीतांजली हंबीर, मंडळ अधिकारी एस.के शहा तलाठी, शिक्षक, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, सदस्य, आशा सेविका, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील आणि आदी ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

# सोनगाव ग्रुप कुणबी युवक संघटना पुन्हा सक्रिय

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न रोहे तालुका कुणबी समाज अंतर्गत सोनगाव कुणबी ग्रुप आपल्या ग्रुपमध्ये व तालुक्यात सामाजिक कार्य करण्यास सक्रीय झाला असून तरूण युवा पिढी जोमाने कामाला लागली असल्याचे दिसून येत आहे.

रोहे तालुक्यात ७० % असलेला कुणबी समाज आज सर्वच बाबतीत पुढारलेला दिसून येत आहे. पुर्वाश्रमीच्या समाज नेत्यांनी संघटनेचे लावलेले रोपटे समाजात अधिक व्यापक गतीने पुढे कसे येईल यासाठी कुणबी युवक देखील पुढे येत असून सोनगाव विभागात युवा संघटनेला आलेली मरगळ दूर सारून नव्या जोमाने पुन्हा सामाजिक कार्यात सक्रिय झाली असून जुन्या जाणत्या समाज नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील तरूण पिढी सामाजिक कार्यात पुढे येऊन गावागावात गाठीभेटी घेताना दिसत आहेत.

सध्या रोहे तालुक्यात राजकीय बोलबाला अधिक वाढत चालला असून या राजकारणापायी प्रत्येक समाजाची अधोगती होत असताना दिसत आहे. तर राजकारणात तरूण वर्गाला राजकीय नेत्यांची भूरळ पडत चालली असून सामाजिक विकासासाठी तरूण एकवटताना दिसून येत नाहीत. हे असेच चालू राहिले तर समाजाची अधोगती व्हायला वेळ लागणार नाही. याच जाणिवेतून सोनगाव येथील युवा वर्ग पुन्हा एकदा समाजाकडे आकर्षित झाला असून सामाजिक हितासाठी त्यांनी गावोगावी गाठीभेटी घेऊन समाजात जनजागृती करण्याचे काम हाती घेतले आहे.

सोनगाव सारख्या ग्रामीण भागात समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी ग्रुपमधील युवकांनी टाकलेले एक पाऊल पुढे हे समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने हितावह असल्याची प्रतिक्रिया जुन्या जाणत्या समाज नेत्यांकडून व्यक्त होऊ लागली आहे. तरुणांच्या या पुढाकाराने भविष्यात नक्कीच या गोष्टीचा समाजास अधिक लाभ होईल असेही बोलले जात आहे.

# शौर्य दिनासाठी स्वाभिमानी युथचे कार्यकर्ते भिमा कोरेगावला जाणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्ह्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने भिमा कोरेगावला जाणार आहेत.

या संदर्भात जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी पक्षाच्या प्रमुख पदाधिकार्यांची बैठक घेतली. या बैठकीत १ जानेवारी रोजी भिमा कोरेगाव येथे जास्तीत जास्त कार्यकर्ते अभिवादन करण्याकरिता जाण्याचा निर्णय घेण्यात आला. रायगड जिल्ह्यातील सर्व तालुकाध्यक्षांना व शहराध्यक्षांना लवकरच कार्यक्रम सुचित केला जाणार आहे. त्याचप्रमाणे आगामी पनवेल महानगरपालिका निवडणूक व १८ जानेवारी रोजी होणार्या ग्रामपंचायत, नगरपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद पोट निवडणुकांसाठी उमेदवार उभे करण्यासंदर्भात सुद्धा चर्चा करण्यात आली.

# पेण मधील 300 विद्यार्थ्यांनी लुटला 'ख्रिसमस पार्टी' चा आनंद

## राजू पिचिका यांच्या रामेश्वर ग्रुपचा पहिला उपक्रम



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण येथील समाजसेवक राजू पिचिका यांच्या रामेश्वर ग्रुप यांच्या माध्यमातून पेण शहरातील विविध शाळांतील ३०० मुलांसाठी नाताळच्या पूर्वसंध्येला ' ख्रिसमस पार्टी ' चे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात खेळ, संगीत, डान्स स्पर्धा, खाऊ, मॅजिक शो आणि सांताक्लॉजने दिलेल्या गिफ्टस् वाटप अशा वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पेण कारमेल स्कुल, प्ले ग्रुप आणि आई डे केअर येथील दिव्यांग विद्यार्थ्यांनी ख्रिसमस पार्टीचे मनमुराद आनंद लुटला.

या कार्यक्रमाचे नियोजन लक्ष्मी पिचिका, नेहा झावरे, प्रतीक्षा कदम, लीना पाटील, मेघा मोरे, वैशाली दिघे, अर्चना शिंगरुत, नीता रामधरणे, लाहिरी पिचिका, वामशिका पडवळ, आकांक्षा मोरे, शुभ्रा झावरे, रोहीत पिचिका आणि हर्ष शिंगरुत यांनी केले.

अत्यंत उत्साह व आनंदात सर्व विद्यार्थ्यांनी व पालकांनी सदर ख्रिसमस पार्टी कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमाचा शेवट प्रसिद्ध डान्सर गौरव पाटील यांच्या विशेष नृत्याविष्काराने झाला.

# महाड शहरातील पुरबाधित शाळांचे बहिरंग बदलले चिमुकल्या हातांनी

## साने गुरूजी जयंतीनिमित्त राष्ट्रसेवादलाचा उपक्रम

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

परमपूज्य साने गुरुजी जयंतीनिमित्त राष्ट्रसेवा दलाच्या कार्यकर्त्यांनी तसेच माणगाव तालुक्यातील वडघर येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक समितीतर्फे महाड नगरपालिकेच्या शाळा क्रमांक १ व २ मध्ये रंगांची शाळा हा उपक्रम आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ चित्रकार राजू सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे राबविण्यात आला. राष्ट्र सेवा दलाच्या पुढाकाराने महाड येथील नगरपरिषदेच्या शाळेत साकारलेली रंगाची शाळा या उपक्रमामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर कॉलेज,महाड चे एनएसएस आणि एनसीसीचे विद्यार्थी कॉलेजचे प्रा.विक्रांत बागडे,प्रा.संजय वाबळे, प्रा.विश्वास पाटील, कॅप्टन एन.आर. चव्हाण, प्रा. बटावले, प्रा.शिंदे तसेच महाड नगर परिषद शाळा क्रमांक १चे मुख्याध्यापक भरत जाधव,दिनकर बहिरम,स्नेहल माळवदे,दीपाली हाटे, शाळा नंबर २ च्या मुख्याध्यापिका मिनिता हाटे,स्नेहल टिपणीस,सुप्रिया मोरे, स्नेहा चिखले, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार राजू सुतार, चित्रकार संदीप गुरव,वैशाली ओक,नवीन परमार,हितेश उतेकर, राष्ट्रसेवा दल आणि सानेगुरुजी राष्ट्रीय स्मारकाचे कार्यकर्ते संजय मं.गो. सिरत सातपुते, शरद कदम,महादेव पाटील, लतिका सु.गो. मिलिंद टिपणीस, सावित्री मुंढे,मेनका मुंढे,किशोरी लाड,गीतांजली पाटील,मारुती पवार,प्रशिक गायकवाड,बाबाजी धोत्रे, शाळेतील विद्यार्थी,पालक,स्थानिक रिक्षा चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी संजय मंगो यांनी महाड शहरातील पुरहानीनंतरदेखील राष्ट्रसेवा दलामार्फत पुरग्रस्तांना थेट मदत देण्याचा उपक्रम नगरपालिकेच्या नवीन इमारतीमध्ये घेण्यात येऊन हातगाड्या, टर्पयांची दुकाने, शिलाई मशीन तसेच अन्य उपकरणांचे मोफत वाटप करून यशस्वी करण्यात आला. मात्र, राज्य सरकारकडून काही ठोस मदतीसाठी पाठपुरावा करीत असताना शाळागृहे व अन्य सार्वजनिक इमारतींना सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न करताना नगरपालिकेच्या शाळा क्रमांक आणि मध्ये राष्ट्रसेवा दलाच्या महाड युनिट तर्फे सुस्थितीत आणण्यासाठी प्राप्त झालेल्या सुचनेनुसार आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार राजू सुतार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न सुरू केले, अशी माहिती दिली.



आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्येष्ठ चित्रकार राजू सुतार यांनी, यावेळी शाळांमध्ये येर्णाय़ा विद्यार्थी विद्यार्थिनींना सिलींग फँनच्या उंचीपर्यंत चिखलाने माखलेल्या इमारतींमध्ये शिक्षण घेताना निश्चितच वेगळी भावना असेल हे लक्षात घेऊन साने गुरूजी जयंती निमित्त रंगांची शाळा उपक्रम याच लहानग्या हातांनी राबविण्याचे ठरविले आणि सर्वांनी मन मुरादपणे आनंद घेत शाळेची इमारतदेखील आनंदी केल्याचे यावेळी सांगितले. यावेळी माजी विद्यार्थिनी असलेल्या त्रिशाला गंभीरे या पालक महिलेने आपल्या पाल्यांसमवेत रंगांचा आनंद घेतल्याचे आवर्जून सांगितले. सायंकाळी महाडच्या नगराध्यक्षा स्नेहल जगताप यांनी या रंगांच्या शाळेला भेट देऊन राष्ट्रसेवा दलाचे विशेष कौतुक केले.

# युवा सेनेची मुरुड कार्यकारिणी जाहीर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे माळी समाजाच्या हॉलमध्ये शिवसेना –युवा सेनेच्या झालेल्या सभेत युवा सेनेची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.यामध्ये अलिबाग विधानसभा समन्वयक पदी रुपेश रोटकर, तालुका युवा अधिकारी पदी दिपेश वरणकर तर उपतालुका युवा अधिकारी पदी ओमकार साखरकर व विक्रांत कुबल यांची निवड करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नेते तसेच युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी अलिबाग व पेण विधानसभेतील युवा सेनेचे युवा पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या असून त्याचाच भाग मुरुड तालुक्यातील नांदगाव येथे माळी समाजाच्या हॉलमध्ये जिल्हा परिषदेचे विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली मान्यवरांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या सभेत युवा सेनेची मुरुड कार्यकारिणी जाहीर करण्यात आली व नवनिर्वाचितांना नियुक्ती पत्र देण्यात आले.



रायगड जिल्हा परिषदेचे विरोधी पक्षनेते सुरेंद्र म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख प्रशांत मिसाळ, रायगड विस्तारक जयेश पाटील, युवासेना जिल्हाधिकारी सुधीर ढाणे, जिल्हा परिषद सदस्या सौ.राजेश्री मिसाळ, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, महिला संघटक शुभांगी करडे, तालुका पंचायत समितीचे उपसभापती चंद्रकांत मोहिते, विभाग प्रमुख नरेश कुबल, नांदगाव ग्रामपंचायत सदस्य विक्रांत कुबल,राजू साखरकर पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी युवा सेनेची मुरुड कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.यामध्ये विधानसभा समन्व्यक (अलिबाग विधानसभा)पदी रुपेश रोटकर,तालुका युवा अधिकारी पदी दिपेश वरणकर , उपतालुका युवा अधिकारी पदी ओमकार साखरकर व विक्रांत कुबल, तालुका चिटणीस पदी शुभम भोईर, तालुका समन्वयक पदी सुमित उदेक यांची नियुक्ती करण्यात आली तर विभाग युवा अधिकारी पदी मुनिब कासकर यांची राजपूरी गणात तर अविनाश शिंदे यांची उसरोली गणात नियुक्ती करण्यात आली तसेच विशाल पाटील यांची नियुक्ती करण्यात आली.वळके गणात राम म्हात्रे यांची विभाग युवा अधिकारी पदी, नांदगाव गणात सुयोग भोईर यांची नियुक्ती करण्यात आली तसेच शाखाधिकारी पदी आविष्कार कांबळे नांदगाव बाजारपेठ),विराज कुदुरसे (नांदगाव नागेश्वर नगर), रमेश मोठेबुवा (नांदगाव कोळीवाडा), पंकज पाके (मजगांव), प्रशांत पाटील (वाळवटी),प्रकाश शिंदे (उसरोली), संदेश साळवी (विहूर), अशोक वाजे (वावडुंगी) उपशाखा अधिकारी पदी तन्मय भाटकर (नांदगाव बाजारपेठ), रोहित गिरणेकर (नांदगाव नागेश्वर नगर), शंतनु पाटील (नांदगाव कोळीवाडा), सौरभ गोळे (मजगांव), योगेश पाटील (वाळवटी), जितेंद्र नवघरकर व पंढरी भोईर (उसरोली),प्रकाश भोईर (विहूर),कवेश वरणकर (वावडुंगी)यांची व अक्षय म्हात्रे यांची युवा शाखा समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# बनावट नावाने कॅमेरा घेऊन केली फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बनावट कागदपत्र तयार करून तो कॅमेरा अन्य व्यक्तीला परस्पर देऊन फसवणूक केल्याचा प्रकार खारघर येथे घडला आहे. आरोपी मयुर विलास शिंदे (वय २४) ऊर्फ राहुल रत्नाकर आटपाडकर यांच्या विरोधात खारघर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सेक्टर १२, खारघर प्रेरणा सोसायटी येथील अजित सरोज यांचा कॅमेरा भाड्याने देण्याचा व्यवसाय आहे. मयुर विलास शिंदे हा त्यांच्याकडे कॅमेरा भाड्याने घेण्यासाठी आला. मयूर शिंदे याने त्यांना राहुल आटपाडकर असे नाव व पत्ता असलेले कागदपत्र दिले. त्यामुळे अजित यांनी एक दिवसाकरता मयूर शिंदे यास कॅमेरा भाड्याने दिला. यावेळी त्याच्याकडील आधार कार्ड, पॅन कार्ड, लाईट बिल घेतले. दुसर्या दिवशी कॅमेरा घेऊन मयुर परत आला नाही, त्याला फोन केला असता त्याचा फोन बंद आला.

त्यामुळे त्याने दिलेल्या पत्त्यावर अजित गेले असता राहुल नावाचा इसम त्या ठिकाणी राहत नसल्याचे त्यांना समजले. यावेळी मयूर शिंदे यांचा फोटो त्याच्या मित्रांना दाखवला असता तो धरणा कॅम्प, तळोजा येथे राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर अजित हे त्याच्या घरी गेले असता त्याच्याकडे कॅमेराबाबत विचारपूस केली. यावेळी त्याने कॅमेरा त्याचा मित्र सिद्धू माथुर (सेक्टर १०, कोपरागाव) याच्याकडे असल्याचे सांगितले. अजित हे कोपरा गावात गेले असता तो सापडून आला नाही. त्यामुळे मयुर विलास शिंदे उर्फ राहुल रत्नकर आटपाडकर याने खोटी कागदपत्रे तयार करून कॅमेरा घेऊन फसवणूक केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी खारघर पोलिस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.